Peer Reviewed Journal

ISSN 2319-8648

Impact Factor (SJIF)

Impact Factor - 7.139

# Current Global Reviewer

International Peer Reviewed Refereed Research Journal Registered & Recognized
Higher Education For All Subjects & All Languages

## Changing Religious Movements in Pre-Medieval Indian History

17-18 January 2020 Special Issue - 101 Vol. I

**Chief Editor**
Mr. Arun B. Godam

**Guest Editors**
Dr. B. G. Gaikwad
Principal
Shivaji College, Hingoli (MS)

**Co-Editor**
Dr. Balasaheb Shankarrao Kshirsagar
Head, Department of History
Shivaji College, Hingoli (MS)

**Co-Editor**
Dr. Sandeep G. Londhe
Department of History
Shivaji College, Hingoli (MS)

37. भारतातील महत्त्वपूर्ण संप्रदाय : शैव संप्रदाय 101
भिकाणे शोभा राजेंद्र

38. प्राचिन भारतातील शैव परंपरा 105
शिंदे संदीप शिवाजीराव

39. धार्मिक चळवळीतील वंचीतांचे योगदान– आदिवासी 107
डॉ. बी.एस.क्षिरसागर , प्रा. जी. एम. घुटे

40. विरशैव संप्रदाय 110
प्रा.डॉ.वोचरे जे.एम

41. तांत्रिक पंथाचे विचार 112
प्रा. डॉ. सुभाष रामराव रगडे

42. धार्मिक चळवळी व बौध्द धम्म 114
प्रा.डॉ.प्रकाश संभाजी वाघमारे

43. सुफी संप्रदायाच्या तात्त्वीक भूमिकेचा विकास 118
प्रो.डॉ.शारदा गोविंदराव बंडे

44. भारतातील बौध्द धम्म चळवळ- एक दृष्टिक्षेप 120
प्रा.डॉ. बी.एम.नरवाडे

45. महात्मा बसवेश्वर आणि संत गाडगेबाबा 123
प्रा.सचितानंदशं.बिचेवार

46. लिंगायत धर्म लोकचळवळ : महात्मा बसवेश्वराचे धार्मिक व सामाजिक सुधारणेतील योगदान 127
प्रा.राजकुमार ज्ञानोबा चाटे

47. धार्मिक चळवळींचा स्थापत्यादी कलांवर पडलेला प्रभाव 130
प्रा.डॉ. महेंद्र यादवराव घनसावंत

48. वर्तमान सामाजिक व धार्मिक एकात्मतेसाठी-भक्ती चळवळीची उपयुक्तता 133
डॉ.संतोष सुधाकरराव कोटुरवार

49. संत तुकाराम व संत रामदास यांच्या साहित्यातून समाजदर्शन 135
प्रा. सौ. गीता विशे

50. भारतीय राजकारणातील धर्माचा वाढता प्रभाव - एक दृष्टिक्षेप 139
प्रा.सि.एन पुरी

51. शैव पंथातील नाथ संप्रदाय 143
प्रा. डॉ. संजय भाऊराव गिरे

52. नाथ संप्रदायाचे तत्त्वज्ञान व त्याचा प्रभाव एक अभ्यास 146
प्रा.धनेश मधुकर हरड

53. पूर्व मध्ययुगीन महाराष्ट्रातील संत चळवळ : एक आकलन 148
प्राचार्य डॉ. बबन पवार

PRINCIPAL
Shivaji College, HINGOLI

CURRENT GLOBAL REVIEWER International Multidisciplinary Research Journal | ISSN- 2319-8648
Impact Factor - (SJIF) – 7. 139 | Special Issue -101, Vol. I | Jan. 2020 | Peer Reviewerd

# धार्मिक चळवळीतील वंचीतांचे योगदान– आदिवासी

डॉ. बी.एस.क्षिरसागर
इतिहास विभाग प्रमुख
शिवाजी महाविद्यालय, हिंगोली

प्रा. जी. एम. घुटे
इतिहास विभाग
शांताराम भाऊ घोलप कला, विज्ञान
महाविद्यालय,शिवळे ता. मुरबाड जि. ठाणे

---

**प्रस्तावना–**

धर्मसंस्था ही मानव प्राण्याइतकीच जुनी आहे. मानवी समाजजीवनाचा धर्म हा अविभाज्य भाग आहे. धर्मसंस्थेचा अभ्यास केल्याशिवाय मानवी समाजाचे अध्ययन पूर्ण होऊ शकत नाही. त्यामुळे आदिवासी समाजालाही या धार्मिक अंगापासून अलग करता येणार नाही. प्रस्तुत लेखात "वंचित" या विस्तृत घटकात दलित, स्त्रीया, आदिवासी या घटकांचा समावेश होतो. या लेखात धार्मिक चळवळीवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला जात आहे.

**शोधनिबंधाची उद्दिष्ट्ये –**

1) आदिवासी धार्मिक परंपरांचा अभ्यास करणे.
2) धार्मिक श्रध्देचा समाजजीवनावर झालेला परिणाम.
3) वंचित घटकातील आदिवासी या घटकांचा धार्मिक अभ्यास करणे.

**धार्मिक अर्थ –**

प्राचीन काळी धर्म हा शब्द म्हणून प्रचलित होता. उदा. पुत्रधर्म, स्त्रीधर्म, राष्ट्रधर्म इ. पण नंतर मध्ययुगीन व आधुनिक काळात हिंदू, मुस्लिम, जैन, बौद्ध, यहुदी असा कुठलातरी संघटित प्रवाह डोळ्यासमोर येतो. कोणत्याही अलौकिक, अनाकलनिय, अतिद्रिय अशा शक्तीवर विश्वास ठेवणे आणि ही शक्ती एखाद्या मुर्तीत, प्राण्यात, वृक्षात, मानवात आहे, असा विश्वास ठेवणे. धर्माचा गुणधर्म असाही एक अर्थ आहे. उदा. पारदर्शकता काचेचा गुणधर्म आहे. डंख मारणे विंचवाचा गुणधर्म आहे. जाळणे आगीचा गुणधर्म आहे. तसेच मनुष्यप्राण्यातही गुण असतात, त्यालाच उद्देशून मनुष्य धर्म हा शब्दप्रयोग आला असावा.

**धर्माची व्याख्या–**

1) कडवॅर्ड टायलर– दिव्यप्राण्यावरील श्रध्दा म्हणजे धर्म होय.
2) हॅरी जॉन्सन – अतिमानवी प्राणी, शक्ती, ठिकाणे व वस्तुशी संबंधीत श्रध्दा व आचारपध्दतीचा कमी जास्त प्रमाणात सुसंगत अशी व्यवस्था म्हणजे धर्म होय.

**1)सर्वात्मवादी सिध्दांत–**

कडवर्ड टायलर हे या सिध्दांताचे प्रणेते आहेत.

प्रारंभीच्या काळात आपल्या प्राथमिक गरजा पूर्ण करण्यासाठी मानवाचा निसर्गाशी जवळचा संबंध आला. वादळ, ऊन, वारा, पाऊस, रोगराई, ढगांचा गडगडाट, वीज, महापूर या नैसर्गिक घटनांचे त्याने निरिक्षण केले, जनावरांचे कळपच्या कळप मृत्युमुखी पडत, माणसे झोपतात, झोपेत स्वप्न पाहतात, जागे झाल्यावर वास्तवाची जाणीव होते. पाण्यामध्ये प्रतिबिंब दिसते. डोंगर द–यातून प्रतिध्वनी येतो. मनुष्य झोपतो आणि मृत्यू पावतो. यामध्ये नेमका फरक काय? आदिमानवासाठी या सर्व गोष्टी अनाकलनीय वाटत होत्या. मानव जीवंत असतांना अशी कोणतीतरी शक्ती असावी की, ती निघून गेल्यावर मानवी शरीर अचेतन बनते. पण या शरीरातील गुढ अशी शक्ती नष्ट होत नाही. यालाच आदिमानवाने 'आत्मा' नाव दिले. हा आत्मा अति मानवी शक्तीत विलीन होतो, ही शक्ती संपूर्ण विश्व नियंत्रित करते. ती कोपल्यावर आपल्यावर संकटे येतात. असे आदिमानवाला वाटू लागले. आपल्यावरील संकटे टाळायची असल्यास आपण त्यास शरण गेले पाहिजे, अशी त्याची धारणा झाली त्यातुनच त्याने या शक्तीला आपले परमेश्वर मानले, त्याची मंदिरे बांधून पूजा अर्चा सुरु केली. अशाप्रकारे विधी किंवा कर्मकांड करणा–या लोकांचा समूह उदयास आले. त्यांची संबंधीत जिवनपध्दती आकाराला आली ती म्हणजे धर्म.

**2) सचेतनवाद–**

आर.आर. मॅरेट यांनी सचेतनवाद हा सिध्दांत मांडला. त्यानुसार विश्वातील सर्वच मूर्त आणि अमूर्त किंवा दृश्य आणि अदृश्य अशा सर्व गोष्टींमध्ये कुठल्यातरी गोष्टींचे वास्तव्य असते. या शक्तीमुळेच पाने हालतात, पाऊस पडतो, पिके येतात असे आदिमानवाला वाटले. या शक्तीच्या कमी अधिक प्रमाणानुसार तीचे परिणाम जाणवतात.

**3) निसर्गवादी सिध्दांत–**

या सिध्दांताचे प्रणेते प्रसिध्द विचारवंत मॅक्समुल्लर हे आहेत. त्यांच्या मते प्राचीन मानवाचा संबंध ऊन, वारा, पाऊस, झाडे इत्यादीशी नेहमी आला व हे घटक मानवाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी महत्वाचे होते. उदा. पाऊस पडला तर पिके येतात, अन्यथा नाही. त्यामुळे आदिमानवाने या घटकांची पूजा–अर्चा करण्यास सुरुवात केली. यातुनच इंद्र,



PRINCIPAL
Shivaji College, HINGOLI

३२

वरुण, मरुत, वायू, पर्जन्य, गंगमैय्या, कृष्णमाई याचबरोबर वड, पिंपळ, आंबा, वाघ, बैल यांची पूजा सुरु करण्यात आली. यातून ते संबधित शक्तीला प्रसन्न किंवा शांत करण्याचा प्रयत्न करतात.

**4) कार्यवादी सिध्दांत–**

ब्रॉनिस्ला मॅलिनॉस्की, रॅडपलीक ब्राऊन, एमिल डुरस्वाईम इ. विचारवंतांनी या सिध्दांताचा पुरस्कार केला आहे. प्रत्येक संस्कृतीमध्ये कर्मकांड पार पडतात. ज्या कार्याची समाजाला गरज असते ते टिकुन असतात व बाकीचे क्षीण होतात. या सिध्दांताला पुरस्कर्त्यांच्या मते धर्म ही सुध्दा समाजाच्या कार्यात्मक गरजा भागविण्यासाठी निर्माण झालेली संघटना आहे. सामाजिक किंवा भावनात्मक ऐक्य धर्माच्या माध्यमातून निर्माण होते. माणसाच्या बेलगाम, बेशिस्त वर्तनाला नियंत्रित करण्याच्या आवश्यकतेनुसार धर्माची निर्मीती झाली असावी.

वरीलपैकी कोणताही सिध्दांत पूर्णपणे साकाराई नाही. प्रत्येक सिध्दांतावर टीका झाल्या आहेत, तसेच प्रत्येक सिध्दांताच्या काही मर्यादा आहेत.

**धर्माची वैशिष्ट्ये–**

**1) श्रध्दा–**

हे विश्व कोणते तरी एक अतिमानवी शक्ती नियंत्रित करते. जगामध्ये वेगवेगळ्या समूहात या अतिमानवी शक्तीबद्दल मानवाच्या मनात आदरयुक्त भावना असते. ही भावना म्हणजे श्रध्दा होय. ही श्रध्दा आत्मा, आत्म्याचे अस्तित्व, भूत, प्रेतात्मा, पिशाच्छ इ. निगडीत असते. आदिवासींचे जीवन निसर्गाशी निगडीत असल्याने त्यांच्या श्रध्दाही निसर्गाशी संबंधित आहेत.

**2) कर्मकांड–**

कर्मकांड म्हणजे अतिमानवी शक्ती किंवा दैवी शक्तीला प्रसन्न करून घेण्यासाठी श्रध्दापूर्वक काही कृती करणे होय.

उदा. पाऊस पडणे, शेत पिकणे, शिकार मिळणे, परिक्षेत पास होणे, इ. घटना दैवी असल्याने त्यात यशस्वी होण्यासाठी दैवी शक्तींची पूजा, प्रार्थना, मंत्र, होम, यज्ञ यासारख्या कृती करतात. आदिवासी समाजामध्ये नांगरणीपासून ते धान्य घरात आणण्यापर्यंत व पीक चांगले यावे, पाऊस चांगला पडावा, पिकांचे रक्षण व्हावे यासाठी वेगवेगळे कर्मकांड केली जातात.

**3) पवित्र – अपवित्रेची भावना–**

मानवी जीवनातील सततच्या असुरक्षिततेच्या भीतीमुळे मानवप्राणी अतिमानवी दैवी शक्तीला शरण गेला. श्रध्दा, कर्मकांडे यामुळे पवित्र–अपवित्रतेची भावना रुढझाली. चांगल्या स्वच्छ बाबींचा संबंध हा पावित्र्याशी, तर अस्वच्छ ओंगळ बाबींचा संबध अपवित्र भावनेशी जोडला गेला.

धान्य पेरणी, काढणे यावेळी आदिवासी अवित्र–अपवित्रतेचे काटेकोरपणे पालन करतात, तसेच ते काही झाडांनाही पवित्र मानतात.

**4) प्रतिके –**

एखाद्या संकल्पनेशी निगडीत जी चिन्हे असतात, त्याला 'प्रतिके' असे म्हणतात. मानवी वर्तनामध्ये या प्रतिकांना महत्वाचे स्थान असते. ती सजीव किंवा निर्जीव असू शकतात. उदा. मणी–मंगळसूत्र, कुंकू, जोडवी ही हिंदू स्त्रीयांची सौभाग्य, प्रतिके आहेत, की ज्याचे ते मनोभावे पूजन करतात.

**5) धर्मसंघटन–**

श्रध्दायुक्त कर्मकांडाने आचरण करणा–या समुहाचेच पंथ, सांप्रदाय निर्माण होतात. या कर्मकांडांप्रमाणे समाजातील सदस्यांनी वर्तन केले नाही, तर कोप होतो अशी समजूत आहे. किंवा तसे वर्तन करणा–या व्यक्तीवर सामाजिक बहिष्कार टाकला जातो. त्यामुळे एक संघटीत समाजवर्ग तयार होतो. यातुनच आदिवासींमध्ये 'जमातपंचायती' उदयास आल्या असाव्यात.

**धर्माची कार्ये–**

**1) सामाजिक ऐक्य**–अनेक व्यक्तींतील परस्पर संबंधातून समाज निर्माण झाला असला, तरी सामाजिक विकासासाठी सामाजिक ऐक्य तेवढेच महत्वाचे आहे. सामाजिक ऐक्याचे धर्म हे प्रभावी साधन आहे. आदिवासी "साथ" व "डोंगरदेव" ही त्याचीच उदाहरणे आहेत. यावेळी आदिवासी प्रत्येकी आर्थिक सहकार्य करून स्वयंसेवक म्हणून कार्य करतो.

**2) सामाजिक नियंत्रण**–धर्म हे सामाजिक नियंत्रणाचे अतिशय प्रभावी साधन आहे. आपल्या सदस्यांच्या बेशिस्त, अनैतिक, समाज विघातक वर्तनाला प्रतिबंध घालून त्याच्या वर्तनाला वळण लावण्याचे आणि दिशा देण्याचे काम धर्मसंस्थेद्वारे केले जाते. हे अलिखीत असे कायदे असतात. पण समाजातील प्रत्येक व्यक्ती तिचे काटेकोरपणे पालन करतो अन्यथा टिकेचे भक्ष बनतो. आदिवासींमध्ये समाज नियंत्रणासाठी त्याचा प्रभावी हत्यार म्हणून वापर केला जातो.

PRINCIPAL
Shivaji College, HINGOLI



83

**CURRENT GLOBAL REVIEWER** International Multidisciplinary Research Journal | ISSN- 2319-8648
Impact Factor - (SJIF) – 7. 139 | Special Issue -101, Vol. I | Jan. 2020 | Peer Reviewerd

) **ताण–तणाव मुक्ती**–मानवी जीवनामध्ये उपेक्षा, निराशा, अपयश, दुःखकारक घटना घडत असतात. अशा वेळेस ानसाला धर्मच तारतो, कारण अशा वेळी माणूस सर्व शक्तीमान अश्या ईश्वराला शरण जातो. त्याची आळवणी करतो. ादिवासींचे जीवन तर निसर्ग लहरींवर अवलंबून असते. त्यामुळे त्यांना नैसर्गिक पुजेतून आत्मीक समाधान मिळते.

**नेष्कर्ष –**

नैसर्गिक घटनांचे निरीक्षण केल्यानंतर आदिमानवाला असे दिसून आले की, महापूर, वादळ, भूकंप यासारख्या ालयांचा माणूस सामना करू शकत नाही किंवा टिकू शकत नाही. आणि या गोष्टी नैसर्गिक प्रकोपातून घडतात, त्यामुळे नेसर्गाचा प्रकोप होऊ नये यासाठी त्याची पूजा करुन त्याला सतत शांत ठेवण्यातच आपले हित आहे.

याचबरोबर शेती पिकविणे, शिकार करणे हे सुध्दा नैसर्गिक अनुकुलतेवरच आधारित आहे, म्हणून आदिमानवाने ाऊस, धरती यांची पूजा सुरु केली. एवढेच नव्हे तर शेतीला उपयुक्त अश्या प्राण्यांचे म्हणजे गुरांचे रक्षण व्हावे, यासाठी ाघ या प्राण्याची ते पूजा करतात. रोगराईपासून आपले गाव दूर राहावे, यासाठी गावाच्या वेशीवर त्यांनी गावदेवीची उभारणी केली. 'जागरण', 'गोंधळ' हे प्रकार अमलात आणले.

आपल्या जमातीमध्ये एकवाक्यता ठेवण्यासाठी "जातपंचायत" किंवा "जमातपंचायत" नेमून त्याद्वारे सामाजिक नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न केला. या जमातपंचायतीत समाजातील जेष्ठ अनुभवी व्यक्तींना स्थान देण्यात आले.

वरील सर्व प्रकार धर्मसंस्थेत मोडतात. यावरुन असे म्हणता येईल की, आदिवासी समाजरचनेतच धर्मसंस्थेला प्रारंभ झाला होता. नव्हे धर्माची मुहुर्तमेढ आदिवासी संस्कृतीमध्ये रोवली होती. त्याची प्रगत अवस्था म्हणजे आधुनिक धर्मरचना होय.

**संदर्भ ग्रंथसूची–**

1) संगवे विलास –'आदिवासींचे सामाजिक जीवन'– पॉप्युलर प्रकाशन मुंबई 1987
2) माणिक माने –'भारतीय समाज'– विद्या प्रकाशन नागपूर, जुलै 2004
3) डॉ. जोशी ज. वा. –'धर्माचे तत्वज्ञान' – कॉन्टीनेंटल प्रकाशन, पुणे 30
4) प्रा. दिक्षीत एस. एच. –'नीतीमीमांसा' – कॉन्टीनेंटल प्रकाशन, पुणे 30
5) डॉ. शैलजा देवगावकर –'आदिवासी विश्व' – आनंद प्रकाशन, नागपूर
6) डॉ. महेश्वरी गावित –'आदिवासी लोकपरंपरा'– चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद
7) संकलन श्री चिमा जावंजी पथके चिंचोडी ता.अकोले, जि. अहमदनगर
8) चाळीसगाव डांगणी (खंड 1) डॉ. अनिल सहस्त्रबुध्दे – आनंदोत्सव चॅरीटेबल ट्रस्ट प्रकाशन मंच, अहमदनगर

PRINCIPAL
Shivaji College, HINGOLI